नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १६३ Issue - 163 | वार रविवार दि. २ नोव्हेंबर २०२५ Blow- Sunday Date 2 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मतचोरीच्या विरोधात सत्याच्या मोर्चा

## आयोजकांवर गुन्हा दाखल होणार, भाजपच्या आंदोलनावरही कारवाई होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मतदारयादीतील घोळ आणि मतचोरी विरोधात आज (१ नोव्हेंबर) मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पहिल्यांदाच एकत्रित रस्त्यावर उतरले होते. त्यांच्याबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, किसान सभेचे नेते अजित नवले उपस्थित होते. त्याचबरोबर अनेक संघटनांचे पदाधिकाऱ्यांनी देखील मतचोरीच्या विरोधात आज मोर्चा काढला. या मोर्चाला प्रत्युत्तर देण्यासाठी सत्ताधारी भाजपने देखील आज मूक आंदोलन केलं होतं. या दोन्ही आंदोलनाच्या संदर्भात महत्वाची अपडेट समोर आली आहे.

विरोधकांनी आज जो मतचोरीच्या विरोधात सत्याच्या मोर्चा काढला होता, त्या प्रकरणी त्यांच्या गुन्हा दाखल होणार आहे. या प्रकरणी आयोजकांवर गुन्हा दाखल होणार असल्यावही माहिती मिळाली आहे.

तसेच भाजपने देखील विरोधकांच्या मोर्चाला प्रत्युत्तर देण्यासाठी आज मूकमोर्चा आंदोलन केलं होतं. त्यांच्या विरोधतही गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती मिळत आहे. कारण, परवानगीशिवाय मोर्चा आणि आंदोलन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. याप्रकरणी आयोजकांवर गुन्हा दाखल होणार आहे. आझाद मैदान



पोलीस ठाणे आणि झोन २ मध्ये डी बी मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होणार आहे.

**राज ठाकरेंनी वाचला दुबार मतदारांचा पाढा**

१ जुलै २०२५ च्या तारखेनुसार उत्तर मुंबईत १७३९४५६ यातील ६२३७० दुबार मतदार आहेत. राज ठाकरे यांनी मुंबईतील लोकसभा मतदारसंघात किती दुबार मतदार आहेत याची माहिती दिली. मुंबई उत्तर पश्चिम ६०२३१,मुंबई उत्तर पूर्व मध्ये ९२९८३ दुबार मतदार, मुंबई उत्तर मध्ये ६३७४० दुबार मतदार, मुंबई दक्षिण मध्य मतदारसंघात ५०५६५, दक्षिण मुंबईत ५५२०५, नाशिक लोकसभा मतदारसंघात ९९६७३ दुबार आणि मावळ १४५६३६ दुबार मतदार आहेत. दुबार मतदार म्हणत राज ठाकरेंनी कागदपत्रांच्या डोंगर दाखवला. राज ठाकरे यांनी याला निवडणुका म्हणतात का? असा सवाल केला. यातून लोकशाही टिकेल का असा सवाल त्यांनी केला. आमदार सांगतो २० हजार मतं बाहेरून आणली.नवी मुंबईत आयुक्तांच्या बंगल्यावर मतदार नोंदवले गेले. शौचालयात मतदार नोंदवले गेले ही लाजिरवाणी गोष्ट सुरु आहे. मशीन्सच डेमन्स्टार्शन केलं आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत २३२ आमदार विजयी होऊनही राज्यभर शांतता होती. सगळ्यांना जर प्रश्न असेल निवडून आलेल्यांना देखील प्रश्न पडला होता. हा सगळं प्रकार निवडणूक आयोगांमार्फत सुरू आहे. हा मतदारांचा अपमान नाही का? त्यांच्या मताला काय किंमत आहे, असा सवाल राज ठाकरेंनी केला.

# यंदा नोव्हेंबर महिन्यातही राज्यात पावसाचे सावट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील बहुतांश भागात परतीच्या पावसाने विश्रांती घेतली असली तरी काही भागात मात्र अद्यापही पावसाचे सावट आहे. अशात पावसासंदर्भात एक महत्वाची माहिती समोर आली आहे. यंदा नोव्हेंबर महिना देखील पावसाचाच असल्याची माहिती समोर आली आहे. तर राज्यात नोव्हेंबर महिन्यात किमान तापमान सरासरीच्या तुलनेत अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागकडून वर्तविण्यात आली आहे. परिणामी, राज्यात नोव्हेंबर महिन्यात थंडीचा जोर कमी असणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे. नोव्हेंबर महिन्यात राज्याबरोबरच संपूर्ण देशात देखील सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. यंदा ऑक्टोबर महिन्यात राज्यात सरासरीच्या ५ टक्के अधिक पाऊस झाला असल्याची माहिती हवामान विभागकडून देण्यात आलीय. केंद्रीय पथक महाराष्ट्रातील पूरग्रस्त आणि अतिवृष्टी भागाची पाहणी करण्यासाठी दाखल झाले आहे. हे पथक प्रामुख्याने मराठवाड्यातील नुकसानग्रस्त भागावर लक्ष केंद्रित करणार असून, केंद्रीय गृह मंत्रालयाचे सहसचिव आर. के. पांडेय या पथकाचे नेतृत्व करत आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाचे सहसचिव आर. के. पांडेय यांच्या नेतृत्वाखालील या पथकात आठ जणांचा समावेश आहे.

# वेंकटेश्वर स्वामी मंदिरात चेंगराचेंगरी; नऊ भाविकांचा मृत्यू, अनेक जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आंध्र प्रदेश : आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यातील काशीबुग्गा येथील वेंकटेश्वर स्वामी मंदिरात चेंगराचेंगरी झाल्याची घटना समोर आली आहे. शनिवारी झालेल्या या चेंगराचेंगरीत जवळपास ९ भाविकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर अनेक जण जखमी झाल्याची भीती व्यक्त

**दर्शनावेळी गर्दीत मोठी दुर्घटना**

केली जात आहे.

वेंकटेश्वर स्वामी मंदिरात एकादशीनिमित्त भाविकांची मोठी गर्दी होती. या गर्दीत हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी जमली होती. अचानक धक्काबुक्की झाली आणि चेंगराचेंगरी झाली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेनंतर लगेचच स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मदत आणि बचाव कार्य सुरू केलं. जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी वेंकटेश्वर स्वामी मंदिरात एकादशीनिमित्ताने मोठ्या संख्येने भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. मंदिर परिसरातील प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दी वाढली. भाविक शिडीवरुन वर मंदिरात जात असताना चेंगराचेंगरी झाली. यावेळी गोंधळ होऊन अनेक भाविक एकमेकांवर कोसळले. यात गर्दीखाली दबून आतापर्यंत ९ जणांचा मृत्यू झाला आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांची पथकं आणि आपत्कालीन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. घटनास्थळी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या घटनेनंतर राज्याचे कृषी मंत्री के. अचन्नायडू मंदिरात पोहोचले असून परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी त्यांनी मंदिर अधिकाऱ्यांची भेट घेतली. गर्दीचं व्यवस्थापन करण्यासाठी आणि मदत कार्यात मदत करण्यासाठी अतिरिक्त पोलिस दल तैनात करण्यात आलं आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबाबत बोलताना सांगितलं, की श्रीकाकुलम जिल्ह्यातील काशीबुग्गा येथील वेंकटेश्वर मंदिरात झालेली चेंगराचेंगरी ही अतिशय दुःखद घटना आहे. या दुःखद घटनेत झालेले जीवितहानी हृदयद्रावक आहे. मृतांच्या कुटुंबियांप्रती माझ्या मी माझ्या तीव्र संवेदना व्यक्त करतो. तसंच त्यांनी जखमींना त्वरित आणि योग्य उपचार देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. तसंच स्थानिक अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना घटनास्थळी भेट देऊन मदत कार्यावर देखरेख करण्याचीही विनंती केली असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

# राज अन् उद्धव ठाकरेंची बऱ्याच वर्षांनी खांद्याला खांदा लावत एकीची वज्रमूठ; निवडणूक आयोगाला गर्भित इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मतदारयादीतील घोळ आणि मतचोरी विरोधात आज (१ नोव्हेंबर) मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पहिल्यांदाच एकत्रित रस्त्यावर उतरले. गेल्या अनेक वर्षांपासून हे चित्र महाराष्ट्राचे राजकारणामध्ये दुर्मिळ झालं होतं. मात्र, गेल्या चार महिन्यांपासून ठाकरे बंधूंमध्ये जिव्हाळा वाढल्यानंतर आज पहिल्यांदाच दोन्ही भाऊ एकत्र उतरल्याने राजकीय वर्तुळाचे सुद्धा लक्ष लागून राहिलं होतं. महाविकास आघाडीसह मनसेकडून राजधानी मुंबईत फॅशन स्ट्रीट ते मुंबई महापालिकेचे मुख्यालय असा विराट सत्याचा मोर्चा काढण्यात आला.

**निवडणूक आयोगाविरोधात रस्त्यावरची लढाई**

या अतिविराट मोर्चामध्ये पायी चालत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे सहभागी झाले. त्यामुळे निवडणूक आयोगाविरोधात रस्त्यावरची लढाई आता मनसेसह महाविकास आघाडीने सुरू केली आहे. जोपर्यंत मतदारयादीमधील घोळ दुरुस्त होत नाही तोपर्यंत निवडणुकाच घेऊ नका अशी एकमुखी मागणी महाविकास आघाडीसह मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सुद्धा घेतली आहे. एका एका घरामध्ये शेकडो मतदार दिसून आले आहेत, अनेक बोगस मतदार सुद्धा असल्याने हे बोगस मतदार कमी करावेत, दुबार नावे काढून टाकण्यात यावीत आणि मतदारयादी स्वच्छ करूनच निवडणुका घ्याव्यात अशी प्रमुख मागणी महाविकास आघाडीसह राज ठाकरे यांनी घेतली आहे. मात्र, अजूनही निवडणूक आयोगाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाविरुद्ध मुंबई ते दिल्ली असा दबाव वाढवण्यासाठी मोर्चाची हाक देण्यात आली. या मोर्चामध्ये शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे सहभागी झाली.

**सत्याचा मोर्चात काँग्रेसही सहभागी**

दुसरीकडे, मनसे आणि शिवसेनेमधील जवळीक वाढल्याने काँग्रेसने महाविकास आघाडीत विरोध करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आजच्या मोर्चात प्रदेश काँग्रेसमधील नेते आणि मुंबई काँग्रेसमधील नेते सहभागी होणार की नाहीत? अशी चर्चा रंगली होती. मात्र, शेवटच्या क्षणी काँग्रेसचे नेतेही मोर्चात दिसून आले. मनसेला थेट विरोध करत असलेल्या भाई जगताप यांचाही मोर्चात सहभाग दिसून आला. बाळासाहेब थोरात, सतेज पाटील, विजय वडेट्टीवार यांच्यासह काँग्रेस नेतेही सत्याचा मोर्चात चालताना दिसून आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतेही मोर्चात सहभागी झाले. त्यामुळे आयोगाविरोधात दबाव वाढवण्यात महाविकास आघाडी आणि मनसेला यश आलं आहे.

## खोटेपणा सिद्ध करणाऱ्यांवरच गुन्हे दाखल

# लोकशाही टिकवण्यासाठी काय पडेल ती किंमत मोजू : शरद पवारांचा एल्गार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: आज महाविकास आघाडीतील घटक पक्ष आणि मनसेकडून मुंबईत मतचोरीविरोधात सत्याचा मोर्चा काढण्यात आला. या सत्याच्या मोर्चात विरोधी पक्षातील नेत्यांनी सहभाग घेतला. त्यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मतचोरीवरून शासनाला धारेवर धरले. शासनंच सगळ्यांना संरक्षण देत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच आता मतचोरी थांबवण्याची जबाबदारी आपली आहे असे आवाहनही त्यांनी केले.

शरद पवार म्हणाले की, काही ठिकाणी काही लोकांनी तक्रारी केल्या. काही ठिकाणी सांगण्यात आलं की इथे बनावट आधार कार्ड मिळते. सिद्ध करून द्या हे आव्हान आले. डेमो दाखवला आणि हा आरोप ज्याने केला त्याच्यावर गुन्हा दाखल केला. खोटारडे आहेत हे सांगण्याचा, सिद्ध करण्याचा जर प्रयत्न कोणी केला तर त्याच्यावर गुन्हे दाखल होतात. याचा अर्थ हे शासन सगळ्याला संरक्षण देते. त्यामुळे तुमची आणि माझी जबाबदारी आहे, काही करा पण मतदानाची चोरी आम्ही थांबवणार. आपण स्वत:साठी काही मागत नाही. आपण ऐवढंच म्हणतो की लोकशाहीमध्ये सविधानानं जो अधिकार तुम्हा आम्हाला दिला त्याचे जतन करा. त्याची आज वेळ आली आहे. आपण बघितलं निवडणुका झाल्या आणि त्या निवडणुकीमध्ये विशेषत: विधानसभेच्या निवडणुकीत जे प्रकार






झाले. त्यामध्ये सामान्य माणसाचा संसदीय लोकशाही यावरचा विश्वासाला धक्का बसला. आज अनेक ठिकाणी लोक अस्वस्थ आहेत.

याठिकाणी उत्तमराव जानकर सोलापूरचे आमदार आहेत. त्यांनी त्यांचा अनुभव तुमच्यासमोर सांगितला. त्यातून स्पष्ट होतं की सत्तेचा गैरवापर सातत्याने केला जातो. यांना तोंड द्यावे लागेल. राजकीय मतभेद असू शकतात. निवडणुकीत संघर्ष असू शकतो. पण या सगळ्या गोष्टी विसरून आम्हाला एक व्हावं लागेल. आणि या देशाचा मतांचा अधिकार लोकशाहीचा हा अधिकार हा जतन करणं हेच आमचं कर्तव्य आहे. हा दृष्टिकोन ठेवून आपण या ठिकाणी निर्धार केला पाहिजे. देशाची लोकशाही टिकवायची असेल. मताचा अधिकार टिकवायचा असेल तर तुम्हाला आम्हाला एक व्हावं लागेल. मी तुम्हाला खात्री देतो. आज व्यासपीठावर असलेले सर्व नेते, सहकारी सगळ्यांच्या वतीने निर्णय घेतला काय पडेल ती किंमत मोजू पण ही चोरी थांबवू आणि या देशाची लोकशाही टिकेल कशी याची खबरदारी घेऊ.

शरद पवार भाषणाच्या सुरूवातीला म्हणाले की, आजचा हा मोर्चा मला जुन्या गोष्टी आठवण करून देतो. महाविद्यालयात शिकत असताना संयुक्त महाराष्ट्रासाठी असे मोर्चे निघाले. काळा घोडा त्याचा परिसर तिथले मोर्चे हे एकप्रकारचा इतिहास निर्माण करणारे हे मोर्चे होते. तुम्ही सर्वांनी जी जबरदस्त एकजूट दाखवली. त्यातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण झाली.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक





प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप
नांव व मतदान केंद्रासहीत
फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

# 'नांदणं, नांदणं होतं रमाचं नांदणं' या प्रसिद्ध गीताचे ख्यातनाम गीतकार - प्रकाश पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लेखनाची आवड सातत्यपूर्ण जोपासणारे, फुले ,शाहू ,आंबेडकर चळवळ जिवंत ठेवण्यासाठी अनेक गीतांच्या माध्यमातून प्रयत्न करणारे, लेखणीतून सातत्याने प्रबोधन करणारे नांदणं ,नांदणं होतं रमाचं नांदणं, दाताचं दातवन घ्या ग कुणी, कुंकू घ्या कुणी काळ मणी यासारखे असंख्य गाण्यांना जन्म देण-ारे लोकप्रिय व्यक्तिमत्व म्हणजेच दिवंगत लोककवी दिवंगत प्रकाश पवार.

कलेच्या माध्यमातून फुले, शाहू, आंबेडकर चळवळ जिवंत ठेवण्याचा काम आणि महाम ानवांचे विचार घराघरात पोहोचवण्याचे काम कवी, साहित्यिकांनी, कलाकारांनी केले आहे. हालाखीच्या हालखीच्या परिस्थितीतही आपल्या फावल्या वेळेत आपल्या लेखणीच्या जोरावर अनेक गीत लिहून सम ाजाचे प्रबोधन करणारे कवी,गीतकार म्हणजे दिवंगत. कवी प्रकाश पवार.

नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील 'देवळा ' हे त्याचं गावं. १५ ऑगस्ट १९४९ रोजी देवळा या एका

खेड्यागावात त्यांचं जन्म झाला. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. मात्र लहानपणासूनच लिख-ाणाची आवड त्यांना होती. त्यावेळी त्यांनी दहावी पर्यंत शिक्षण घेतले होते. त्यावेळचे दहावीचे शिक्षण म्हणजे उच्च शिक्षण समजले जात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा पगडा त्यांच्यावर होता. पुढे कालांतराने ते कल्याण येथील कोळसेवाडी येथे अनेक वर्ष वास्तव्यास होते. तर काही वर्ष त्यांनी ठाणे , वागले इस्टेट येथील भारत इन्स्लुलन कंपनी मधी त्यांनी काही वर्ष नोकरी केली. पुढे कालांतराने त्यांनी नोकरी सोडली आणि गाण्याचे कार्यक्रम करू लागले. त्यातूनच मिळालेल्या मानधनावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह ते करत होते. पवार कुटुंबीय गेली ४७ वर्षापासुन ठाणे जिल्ह्या-तील कसारा येथे (आंबेडकर नगर ) येथे वास्तवास आहेत. त्यांच्या लेखणी-तून अनेक गीत जन्माला आली. आणि त्यातीलच काही गाणी अजरामर ठरली. झाडाखाली निवांत बसताना , प्रवासात असताना, लग्न समारंभ असेल अशा ठिकाणी आपल्या फावल्या वेळेत प्रकाश पवार 'गाणी' लिहत होते. कवी प्रकाश पवार यांनी चांडाळ चौकडी या चित्रपटासाठी जिवन हे पाण्याचा बुडबुडा हे गित लिहिले आहे. 'झेंडा फडकस सतरा शिंगीना' हे अहिराणी गित त्यानी लिहिले. सन १९७४ रोजी त्यांनी बाई सुया घे ग,दाभण घे हे गित तयार करून महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध, ख्यातनाम लोकगीतांचे बादशाह स्वरसम्राट गायक प्रल्हाद शिंदे यांच्या घराण्यातील गायिका रंजना शिंदे यांनी आपल्या कर्णमधुर स्वरांनी हे गीत गायले व मधुकर पाठक यांनी त्या गीताला स्वरबध्द केले. त्यांचे हे लोकगीत संपूर्ण महाराष्ट्रभर गाजले. एक ग्रामीण भागाचं वर्णन त्यांनी या गाण्यांमधून केलेले आहे. ग्रामीण भागात सुया, दाभाण विकण्यासाठी जी महिला येते त्या म हिलेचं वर्णन त्यांनी या गाण्यातून केलेले आहे. हे गाणं कमालीचं लोकप्रिय ठरलं. आणि आजही हे गाणं मायबाप रसिक प्रेक्षकांच्या ओठावर अधिराज्य गाजवत आहे.



दाताचं दातवन घ्या ग कुणी , कुंकू घ्या कोणी काळंमणी' , 'नांदणं ,नांदणं होतं रमाचं नांदणं' ,' माझ्या रमाच्या गौरीन , चुल जगाची पेटवली', 'तारिले विश्वाला',' जेव्हा मराठी माणूस भडकला तेव्हा भगवा झेंडा फडकला', ' वर्गात पहिला ये भीमा तू', व तुझ्या ओल्या वाफ्यामध्ये, पुढे सावित्री सरसावली आग सरणाला लावली', कलिंगची होता हानी. ' मला वाचव वाचव(भ्रूणहत्या )गीत, ' मोट वढतात बैलं नेटानी' अशा अजरामर गीतांसारखी त्यांनी चार हजाराहून अधिक गाणी लिहिली. त्यात बुद्ध,भिमगीत, लोकगीत, भक्तीगीत , कोळीगीत, लग्नगीत,भजन, भारूड, महामानव गीत, प्रबोधन गीत यांचा समावेश असून ही गीते प्रेरणादायी ठरली आहेत. त्यांची अनेक गाणी दिवंगत ज्येष्ठ गायक कलावंत प्रल्हाद शिंदे, आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, उत्तरा केळकर, रंजना शिंदे , दिनकर शिंदे, शकुंतला जाधव, सुनिल खरे, राजू बागुल, चेतन लोखंडे अशा अनेक दिग्गज कलाकारांनी आपल्या सुमधुर स्वरांनी स्वरबद्ध केली आहेत. हीच गीते अमर झाली आणि आजही तितकीच प्रभावी आणि प्रबोधक ठरत आहेत.

कसारा येथे त्यांच्या पत्नी ज्योती प्रकाश पवार राहत आहेत. त्यांचा सांभाळ मुलगा सुनिल पवार करत आहेत. काही वर्षापुर्वी त्यांचा सुपुत्र देवदत्त पवार व सुन यांचे निधन झाल्याने घरातील सदस्यांची सांभाळ व देखभाल करण्याची जबाबदारी वयोवृध्द ज्येष्ठ कवी लोककलावंत प्रकाश पवार यांच्यावर आली होती. अशा परिस्थितीवरही मात करत या लोककलावंताने कुणाकडेही हात न पसरता आपले स्वाभिमानी जीवन जगले. असे स्वाभिमानाने जगण-ारे व्यक्तिमत्व म्हणजे कवी, गीतकार प्रकाश पवार .महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात लेखणीतून साकार झालेल्या गीतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घराघरांत पोहोचविणारे महाराष्ट्राचे ख्यातनाम कवी म्हणजे प्रकाश पवार .

कलाकार घरापासून वंचित : प्रकाश पवार यांचे कुटुंब ठाणे जिल्हातील कसारा येथे पत्र्याच्या घरात अतिशय हलाखीचे जीवन जगत होते. लोककवी दिवंगत प्रकाश पवार यांना घर बांधून देण्यासाठी म हाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिनिधींनी पवार यांना सुसज्ज घर बांधून देण्याचे कबूल केले होते.असा त्यांनी शब्द दिला होता. मात्र आजही पवार यांचे कुटुंब घरापासून वंचित असल्याने पवार कुटुंबाने नाराजी व्यक्त केली आहे. आपला लेखणी-तून सातत्याने प्रबोधन करणाऱ्या एका कलाकाराच्या परिवाराला घरापासून वंचित राहावे लागले. हे दुर्दैव आहे. म्हणूनच आश्वासनं ही पोकळ आणि फसवी असतात हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

वडिलांचा स्वभाव अतिशय प्रेमळ होता. त्याचे राहणीमान अतिशय साधे होते. त्यांच्या अनेक गाण्यातून आम्हाला प्रेरणा मिळते. परिस्थिती जरी गरिबीची असली तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर होता. वडिलांनी अनेक गाणी लिहून त्यांनी पवार कुटुंबाला नावारूपाला आणलं असे त्यांचा मुलगा सुनिल प्रकाश पवार यांनी म ाझ्याशी बोलतांना सांगितले. वडिलांच्या मृत्यूला तीन वर्ष उलटूनही पवार कुटुंबाला घर मिळाले नाही. अशी देखिल खंत सुनिल पवार यांनी माझ्याकडे व्यक्त केली.

गेल्या काही दिवसांपासून ते अंथरुणाला खिळले होते. मात्र शेवटी त्यांची मृत्यूशी झुंज संपली आणि ३ नोव्हेंबर २०२२ रोजी लोककवी प्रकाश पवार यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी कसारा येथील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. मात्र त्यांच्या मृत्यूला तीन वर्ष उलटूनही पवार कुटुंबाला घर मिळाले नाही. बहुजन आणि वंचित, कामगार चळवळीच्या गाण्यात लोककलेत प्रकाश पवार यांचा मोलाचा वाटा आहे. अशा महान कलाकाराला त्रिवार अभिवादन...

**लेखक - मिलिंद सुरेश जाधव**
**रा. पडघा, भिवंडी**
**मो. ८६५५५६९४३६**

# धाराशिव शहरातील प्रभाग क्रमांक १५ मध्ये आदर्श बनसोडे यांची हवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



धाराशिव प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे, शहरा-तील प्रभाग क्रमांक १५ परिसरात आदर्श बनस-ोडे हे चर्चित नाव आहे. त्यांच्या घरातील म हिलांचे सामाजिक कार्य असल्या मुळे सेवा भाव हाच त्यांचा धर्म पारीवारीक स्नेहा मुळे जीव ला-वलेला जनसंपर्क हक्काची माणसे येथे एस.सी प्रवर्गासाठी जागा सुटली असून आदर्श बनसोडे यांच्या घरातील महिला इच्छूक आहेत जनतेच्या सेवेसाठी निवडणूक लढविणार आहेत. त्यांना विविध पक्षांच्या वतीने उमेदवारी मिळेल यात शंका नाही. आदर्श बनसोडे हे युवा वर्गातील आकर्षण असून हाकेला धावून जाणारा नेता ही त्यांची पूर्ण धाराशिव शहरात प्रतिमा आहे.व जनतेच्या अडचणीत सोडविण्या साठी अग्रभागी असणार्या समाज सेवकाला नगर परिषद निवडणुकीत निवडून द्यावे असा मतप्रवाह आहे. प्रभाग क्रमांक १५ मध्ये आदर्श बनस-ोडे यांची पकड असल्या मुळे या ही निवडणुकीत ते प्रभागातील जनतेची पसंत राहणार यात शंका नाही.

जय भीम प्रतिष्ठान या ग्रुप च्या माध्यमातून युवा संघटन आहे , युवकांच्या मनात त्याची वेगळी झेप आहे...

# इंजि. अनिल गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्रीवर स्नेह भोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/प्रतिनीधी : समृद्धी महाम ार्ग साठी जिवापाढ परिश्रम घेतलेले, गोरगरीबांचे आधारस्तंभ , लातूर जिल्ह्यातील सुपुत्र इंजि.अनिलकुमार बळीराम गायकवाड यांचा वाढदिवस युवा भिम सेनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे यांच्या तर्फे मातोश्री वृद्धाश्रम येथे आजी- आजोबा, ज्येष्ठ नागरिकांच्या सानिध्यात स्नेहभोजनाने साजरा करण्यात आला.




वृद्धाश्रमातील आज्जी आजोबांना जेवण औषध पाणी मिळते परंतु आपुलकीच्या ओलाव्याअभावी ते आपले जिवन व्यतीत करीत असतात.मला तुमचा मुलगा समजा असे भावनिक विधान यावेळी बोलतांना पंकज काटे यांनी व्यक्त केले,त्यावेळी आश्रमातील चव्हाण साहेब यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

ज्या लेकरांसाठी आई वडिलांनी आपले जिवन पणाला लावले.शेवटी तेच जन्मदाते आपल्याला नकोसे वाटावेत यापेक्षा मोठी शोकांतिका समाजात दुसरी कोणतीही नाही अशी प्रतिक्रिया प्रवक्ते सुफी सय्यद शम शोद्दीन यांनी आपले मनोगत व्यक्त करताना दिली. कार्यक्रमात गायकवाड साहेबांसाठी उदंड आयुष्याची प्रार्थना सर्वांनी केली.यावेळी युवा भिम से-नेचे संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे, प्रवक्ते सुफी सय्यद शमशोद्दीन, प्रदेशाध्यक्ष कुमार कांबळे, पुणे जिल्हा संपर्कप्रमुख आश्रुबा कांबळे, प्रदेश उपाध्यक्ष महेबुब सय्यद, युवा जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे, महिला जिल्हाध्यक्षा उमाताई आदमाने, विद्यार्थी आघाडी शहराध्यक्ष गणेश पोटभरे, जिल्हा उपाध्यक्ष रोहन रायभोळे, सुनिल मस्के, काका सोणवणे, सविता निकम, ईत्यादि पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका मोठ्या ताकतीने लढवणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या संदर्भात अक्कलकोट वंचित बहुजन आघाडी शहर व तालुक्याच्या वती-ने बैठक घेण्यात आला होता. या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पंचायत समिती जिल्हा परिषद नगर परिषद च्या निवडणुका मोठ्या ताकतीने सामोरे जाणार असून निवडणुकी ची सर्व तयारी पूर्ण झा-लेली आहे. अनेक इच्छुक उमेदव-ार वंचित बहुजन आघाडी च्या वतीने लढवण्यास इच्छुक असून त्यासंबंधीच्या अहवाल पक्षाकडे सादर करण्यात आलेला आहे. आद-रणीय बाळासाहेब आंबेडकर यांचे विचार तळागाळातील वंचित समूहा-तील प्रत्येक व्यक्तीला सत्तेत सहभाग करून घेण्यासाठी जी दिवस रात्र एक करत आहेत त्यांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी तळागाळातील वंचित समूहातील लोकांना न्याय देण्यासाठी वंचित बहुजन आघाडी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लढवणार आहे असे प्रतिपादन जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर मढी खांबे यांनी केले.

**वंचितच्या बैठकीत निर्धार**

तत्पूर्वी ग्वल समाजाचे नेते सतीश चिंचोळे आणि वडार समाजाचे नेते कल्याणी चौगुले यांचा वंचित बहुजन आघाडी या पक्षात प्रवेश घेण्यात आला. या बैठकीत अनेक पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी आ-पले मनोगत व्यक्त करण्यात आले. सर्व कार्यकर्ते येणाऱ्या निवडणुकीस ताकदीने सामोरे जाण्यास सज्ज झालेले आहेत. या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा सुद्धा करण्यात आली आणि जे कोणी इच्छुक उमेदवार असतील जे निवडणुकीसाठी तयार असतील त्यांनी वंचित बहुजन आघाडी यांच्याशी संपर्क सुद्धा साधावा असे आवाहन सुद्धा यावेळी करण्यात आले. प्रत्येक खेडूपाडातील प्रत्येक एक कार्यकर्ता या बैठकीस उपस्थित होता शहरातील व तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते. युवक आघाडी भारतीय बौद्ध महासभा चे पदाधिकारी कामगार आघाडीचे पदाधिकारी यावेळेस उप-स्थित होते

# शेंदुरजन तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी निलेश गुलाबराव गुंड यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील शेंदुरजन ग्रामपंचायतच्या म हात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष निलेश गुलाबराव गुंड यांची एक मताने निवड झाली आहे. नुकतीच ग्रामपंचायतची ग्रामसभा संपन्न झाली. यावेळी ही निवड करण्यात आली. यावेळी तंटामुक्त गाव समि तीची पूर्ण रचना करण्यात आली. या सभेस सरपंच विठोबा शिंगणे उपसरपंच नकुल शिं-गणे .हभप दामुआण्णा शिंगणे महाराज.व ग्राम पंचायत सर्व सदस्य. प्रकाश आढाव.ग्राम सेवक यासह ग्रामस्थ उपस्थित होते. आरोग्य, अंगणवाडी सेविका, म दतनीस, आशा सेविका आदी उपस्थित होते. यावेळी ग्रामसभेत विविध विषय विचारविनिमय करण्यात आला. तसेच तंटामुक्त समितीचे अध्यक्ष व सदस्य निवड करण्यात आली. नूतन अध्यक्ष निलेश गुलाबराव गुंड यांना गावकऱ्यांच्या वतीने शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# चिपळूणच्या 'श्रमिक सहयोग' संस्थेला महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ट संस्था' पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा 'श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट' चे संस्थापक विश्वस्त तथा माजी अध्यक्ष व स्वाईप तथा 'श्री विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव एज्युकेशन' या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व सध्याचे खजिनदार आणि एसव्हीआयटी तथा 'स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान, सोलापूर' चे विश्वस्त व 'संतविचार पीठ' पंढरपूरचे सचिव दादासाहेब रोंगे हे चिपळूण मधील 'श्रमिक सहयोग'चे संस्थापक विश्वस्त असून मा.अध्यक्ष आ-हेत. उत्कृष्ट कामगिरी केलेल्या न्यासांचा (संस्थांचा) सत्कार स. धर्मादाय आयुक्त कोल्हापूर यांचेकडून दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न झाला. त्याम ध्ये श्रमिक सहयोग या संस्थेचा उत्कृष्ट संस्था म्हणून गौरव करण्यात आला.

धर्मादाय सहआयुक्त कार्यालय, कोल्हापूर या विभागाच्या वतीने सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंध-दुर्ग या जिल्ह्यांतील पन्नास हजार संस्थांच्या नोंदी तपासून त्यातून 'उत्कृष्ट' कामगिरी करणाऱ्या तेरा (१३) संस्थाची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये 'श्रमिक सहयोग, चिपळूण' या संस्थेची निवड करण्यात आली आहे. सदर सार्वजनिक संस्थांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन कोल्हापूरम ध्ये करण्यात आले येथे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धम ार्दाय सहआयुक्त निवेदिता पवार ह्या होत्या. यावेळी सहाय्यक धर्मादाय आयुक्त शरद वाळके, विविध विधिज्ञ व पत्रकार उप-स्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बापू जाधव व सहकाऱ्यांच्या 'महाराष्ट्र गीत' गायनाने झाली. 'श्रमिक सहयोग' ही संस्था गेली ४० वर्षे सातत्याने वंचितांचे शिक्षण, महिला सबलीकरण, पर्यावरण संवर्धन, इत्यादी कामे करीत आली आहे. या कार्याचा थोडक्यात आढावा किरण पाटील यांनी घेतला. 'श्रमिक सहयोग' संस्थेच्या वतीने उपाध्यक्ष अभियंता भार्गव पवार, माजी अध्यक्ष, मा.इंजी. दादासाहेब रोंगे, माजी अध्यक्ष प्रा.डॉ. गुलाबराव राजे व संस्थेचे हितचिंतक व देणगीदार आसिफ सय्यद यांनी यावेळी पुरस्कार स्वीकारला. यावेळी संस्थेच्या वतीने श्रमि कचे हितचिंतक मा.इंजी.प्रमोद आसगावकर उपस्थित होते. पुरस्काराचे स्वरूप शाल, प्रम ाणपत्र, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ असे होते. अध्यक्षस्थानावरून बोलताना धर्मादाय सह आयुक्त पवार यांनी 'गेली तीन वर्षे सातत्याने अशा संस्थांचा शोध घेऊन हा उपक्रम राबवत असल्याचे सांगितले. यातून इतर संस्थांना प्रेरणा मिळेल तसेच ज्या संस्थामंध्ये समस्या आहेत त्यांनी अशा उत्कृष्ट संस्थांच्या कार्यातून बोध घ्यावा' असे मत मांडले. यातून धर्मादाय कार्यालयाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलेल तसेच संस्थाच्या पाठीशी धर्मादाय कार्यालय भक्कमपणे उभे आहे हा संदेशही जाईल हे स्पष्ट केले. त्यावेळी जेष्ठ विधिज्ञ यांनी या सामाजिक संस्था मानव सेवेबरोबर समाज बांधणीचे काम करतात म्हणून अशा संस्थेतील कार्यकर्ते हे समाजासाठी देवदूतआहेत असे मत व्यक्त केले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रम ाची सांगता झाली.




पुरस्कार प्राप्त तेरा संस्था पुढीलप्रमाणे आहेत.

कोल्हापूर जिल्हा - यशोदर्शन फौंडेशन, ऊई फॉर सोल्दीर्स, मानव सेवा संस्था, सार्थ एज्युकेशन सोसायटी, श्री स्वामी समर्थ गोसेवा संस्था, जयसिंगपूर, वाचनकट्टा, कोल्हापूर व विकलांग सेवाभावी संस्था, नांदणी. सांगली जिल्हा- विवेकानंद वैदिक प्रतिष्ठान बाम नोळी, मुकबधिर शाळा व अपंग सेवा केंद्र यांचा समावेश आहे. रत्नागिरी जिल्हा- श्रमिक सहयोग व कोव्यास चिपळूण तर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून सोशित मुक्ती अभियान संस्था, उमरमळा, ता. कुडाळ या संस्थेची निवड केली होती.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२



# वारकरी भाविकांना आवश्यक सुविधा देण्याससोबतच स्वच्छतेला प्राधान्य

## जिल्हाधिकाऱ्यांकडून शौचालयाची पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कार्तिकी शुद्ध एकादशी सोहळा ०२ नोव्हें २०२५ रोजी संपन्न होत असून, कार्तिकी यात्रा कालावधीत लाखो वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना दर्शनरांग, पत्राशेड, वाळवंट, भक्तीसागर (६५ एकर) येथे पाणीपुरवठा,आरोग्य, सुरक्षा, स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

पंढरपूर शहरात येणाऱ्या वारकरी-भाविकांना प्रशासनाच्या वतीने चांगल्या दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद सातत्याने प्रयत्नशील आहेत.प्रशासनाकडून चांगल्या सुविधा उपलब्ध करून देत आहे.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः प्रत्येक ठिकाणी जाऊन शौचालयाची व्यवस्था, त्या ठिकाणी पुरेसे पाणी उपलब्ध आहे का? स्वच्छता ठेवण्यात आली आहे का व वारकऱ्यांना शौचालयाचा वापर केल्यानंतर हात धुण्यासाठी हँडवॉश ची ही सोय या ठिकाणी करण्यात आले आहे त्याची पाहणी केली. काही शौचालये स्वतः जिल्हाधिकारी यांनी उघडून पाहणी केली आहे. शौचालय साफसफाई करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ तसेच शौचालयाची वेळोवेळी स्वच्छता करण्यासाठी जेटींग व सक्शेन मशीन उपलब्धता करण्यात आली आहे. स्वच्छतेच्या वाहनांना वाहतुकीचा कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.



# कर्मयोगी इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांची अंतर महाविद्यालयीन रायफल शूटिंग स्पर्धेत भरधाव कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या अंतर्गत आयोजित अंतर महाविद्यालयीन विभागीय शूटिंग स्पर्धेचे आयोजन करण्याची संधी विद्यापीठाची मुख्य क्रीडा समन्वय डॉक्टर शिवाजी कराड व बालाजी फुलचवाढ सर यांनी कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीला दिली या स्पर्धा मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाल्या असून महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील स्पर्धकांनी मोठा प्रमाणात सहभाग नोंदवला

या स्पर्धेचे उद्घाटन डॉक्टर रमेश सिद्ध यांच्या हस्ते पार पडली व या स्पर्धेत कर्मयोगीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले यामध्ये वैष्णवी खटावकर आणि प्रथम क्रमांक, तर आदित्य सदवाले यांनी द्वितीय क्रमांक पटकावला,

या सर्व खेळाडूंना प्राध्यापक गणेश बागल व प्राध्यापक आकाश गुजरे यांचे कुशल मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी आयोजनामुळे कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी चे नाव क्रीडा क्षेत्रात आणखी उज्वल झाले आहे.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, कर्मवीर इन्स्टिट्यूट चे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील, कर्मवीर पॉलिटेक्निकल चे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे, ओ रजिस्टर गणेश वाळके, उपप्राचार्य जगदीश मुडेगावकर, संशोधन अधिष्ठाता डॉक्टर अभय उत्पाद, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा राहुल पांचाळ, विभाग प्रमुख डॉ. एस एस लंबे, डॉक्टर एस व्ही एकलारकर, प्रा अनिल बाबर, प्राध्यापक दीपक भोसले, तसेच सर्व प्राध्यापकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर प्रदा आर्यमान शूटिंग क्लब फिल्म येथे झाल्या.

# लामजना जिल्हा परीषद गटासाठी भाजपने प्रा.संध्याताई सुधिर पोतदार यांना उमेदवारी द्यावी; जनतेतुन मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव :

प्रा सुधिर पोतदार यांच्या सौभाग्यवती प्रा संध्याताई सुधीर पोतदार..M.Sc B.Ed.उच्चशिक्षीत असल्याने लामजना गटाचा सर्वांगीण विकास करतील .

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या होउ घातलेल्या निवडणुकीत लामजना जिल्हा परीषद ओ.बि.सी महिला प्रवर्गासाठी असल्याने व औसा तालुक्याचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार साहेब यांच्या अत्यंत विश्वासू.कार्यकर्ता मनुन नावलौकीक असणारे प्रा सुधिर शंकरराव पोतदार यांची ओळख असुन.सुधिर पोतदार यांनी

गेली पाच वर्ष भारतीय जनता पक्ष लातूर जिल्हा ओ .बी.सी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष म्हणून संपूर्ण लातुर जिल्ह्यात ओबीसी संघटनात्मक बांधणीसाठी काम करत ओ.बी सी समाज एकत्रीत करुन ओबीसीची वज्रमुठ बांधण्याच काम सुधिर पोतदार यांनी केल असुन ..ओ.बी.सी सह

सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी कार्यरत शांत संयमी समजूतदार मनमिळावू स्वभावाचे प्राध्यापक सुधीर पोतदार यांनी शिक्षण क्षेत्रात गेले २१ वर्षे हजारो विद्यार्थी घडविले असून औसा तालुक्यातील जवळपास आठ ते दहा हजार विद्यार्थ्यांना शासकीय नोकरी लागण्यासाठी मदत केलेली आहे,आमदार अभिमन्यू पवार यांच्यासोबत



सावलीसारखे राहणारे भाजपाच्या संघटनात्मक कामात अग्रेसर असणारे.. सर्वांना परीचीत असलेले प्रा.सुधिर पोतदार यांच्या सौभाग्यवती प्राचार्य सौ.संध्याताई सुधिर पोतदार या उच्चशिक्षीत M.Sc B.Ed. असल्याने सर्वसमावेशक जनसामान्यांशी नाळ असलेल्या उच्चशिक्षीत संध्याताई पोतदार यांना लामजना जिल्हा परीषदेसाठी भारतीय जनता पक्षाने उमेदवारी द्यावी अशी मागणी सर्वसामान्यातुन होत आहे, संध्याताई पोतदार यांना जिल्हा परीषद भारतीय जनता पक्षाकडुन उमेदवारी देण्यात यावी यासाठी .लामजना जिल्हा परिषद सर्कल मधील बहुतांश भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व काही गावातील सरपंच यांनी सौ संध्या ताई सुधीर पोतदार यांना उमेदवारी मिळावी म्हणून औसा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार यांच्याकडे भेटून मागणी केलेली आहे...

# के. जी. एस. शुगरमुळे शेतकऱ्यांच्या घरात पुन्हा दिवाळी !!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : चालू हंगामातील अतीवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लगत असतांना केजीएस साखर कारखान्याच्या वतीने. कारखाना कार्यस्थळावर दोनशे छत्तिस शेतकयांना एक कोटी अड्डुसष्ट लाख रुपयांचे मागील थकीत पेमेंट तसेच पिंपळगाव निपाणी ग्राम पंचायतीची मागील थकीत पट्टी तेहतीस लाख अठरा हजार रुपये, तलाठी कार्याल्याचा थकीत कर सहा लाख रुपये, तसेच काही कामगारांचे मागील थकीत पेमेंट सात लाख रूपये, असे अकूण दोन कोटी पंधरा लाख रुपये अदा करण्याचा कार्यक्रम संचालिका सौ. सोनियाताई होळकर व संचालक . प्रकाशशेठ दायमा यांच्या हस्ते पार पडला. यामुळे परीसरातील उस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

के.जी.एस.शुगर कारखाना लासलगांव येथील उद्योजक वेफकोचे चेअरमन . संजय चांगदेवराव होळकर यांनी विकत घेतला आहे. कारखान्याच्या बंद काळातील 'बी' फॉर्म भरलेल्या उर्वरीत ऊस उत्पादकांची थकीत रक्कम पुढील सप्ताहापासून टप्पा-टप्याने वितरीत करण्याचे काम कारखाना कार्यस्थळावर होणार आहे. संबंधीत थकीत ऊस उत्पादकांना लवकरच तशा आशयाचे संदेश मोबाईल द्वारे प्राप्त होतील. जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार थकीत ऊस उत्पादकांनी आपली थकीत रक्कम घेऊन जावी, अशी सूचना संचालिका सौ. सोनियाताई होळकर यांनी शेतकयांना केली आहे.

या कार्यक्रमास प्रगतशील शेतकरी प्रभाकर रायते, रामदास शिंदे, जनरल मॅनेजर सुखदेव शेटे, शेतकी अधिकारी पटेल . व देसले ., गट सुपरवायझर . लक्ष्मण निकम तसेच लालजी गडाख, पोपटराव काळे, सकारी सानप, किरण चकोर, संजय बाजारे, ऋषिकेश सोनवणे, दत्तात्रय बोराडे, ऋषिकेश कुंदे, शरद बोडके व कार्यक्षेत्रातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कारखान्याचा चालू हंगाम शलवकरच सुरु होणार असून कारखान्यास ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऊसाला जास्तीत जास्त भाव व एकरकमी पेमेंट कारखाना देणार असल्यामुळे परीसरातील ऊस उत्पादकांनी कुठलीही घाई न करता, याच कारखान्यास ऊसपुरवठा करावा, तसेच पुढिल हंगामासाठी जास्तीत जास्त ऊसाची लागवड करावी, असे आवाहन संचालिका सोनियाताई होळकर यांनी केली आहे.

# एकता दौड सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त: कामती पोलीस स्टेशन यांच्या वतीने दौंडचे आयोजन






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : एकटा दौड सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त कामती पोलीस स्टेशनच्या वतीने दौंडचे आयोजन. आज दिनांक ३१/१०/२०२५रोजी राष्ट्रीय एकात्मता दिन व सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती यांची औचित्य साधून मा पोलिस अधीक्षक सो. श्री अतुल कुलकर्णी व मा श्री संकेत देवळेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कामठी पोलीस स्टेशन तर्फे एकता दळवी आयोजन करण्यात आले होते. सदर एकटा दौंड मध्ये स्थानिक नागरिक , नवयुवक विद्यार्थी,पत्रकार, व पोलीस पाटील यांच्या मोठ्या संख्येने सामील झाली होती. 'एक भारत श्रेष्ठ भारत' या घोषणा वाक्याखाली सर्वांनी देशात एकता बंधुता अखंडता टिकून ठेवण्याचा संकल्प केला. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री संकेत देवळेकर साहेब यांनी त्यांच्या संदेशातून एकतेचे महत्त्व पटवून देऊन स्थानिक नागरिकांची पोलीस पाटील यांची व पोलीस कर्मचारी यांची कौतुक केली. कार्यक्रमाचे नियोजन व कार्यक्रमाची अंमलबजावणी कामती पोलीस स्टेशनची सह पोलिस निरीक्षक श्री ज्ञानेश्वर उद्धार यांनी प्रभावीपणे केली. या कार्यक्रमाची आभार प्रदर्शन पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री प्रमोद दीक्षित यांनी केली.

# यंदाचा मानाचा वारकरी पुरस्कार तत्त्वचिंतक श्री गुरु प्रमोद महाराज यांना जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वारकरी पंथाची थोर सत्पुरुष चैतन्य सद्गुरु तात्यासाहेब आबासाहेब वासकर महाराज यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी वारकरवारकरीची सेवा करणाऱ्या सेवानिष्ठ विभोवतीला वारकरी पुरस्कार प्रदान केला जातो यावर्षी हा वारकरी अंतातील सर्वोच्च मानाचा पुरस्कार संत साहित्याचे साक्षी पी तत्वचिंतक श्री गुरु प्रमोद महाराज जगताप यांना जाहीर झाला असून त्याचे वितरण श्री क्षेत्र पंढरीत सोमवारी दिनांक ३ नोव्हेंबर रोजी होणार आहे सन्मान चिन्ह सन्मानपत्र महावस्त्र शब्द निधी असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्रीपुर विठ्ठल महाराज वासकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि श्री गुरु चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या शुभहस्ते सोमवार दिनांक ३ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजता वास्कर वाडा संत पेठ पंढरपूर येथे पुरस्कार वितरण होणार आहे या समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री ज्ञानराज प्रतिष्ठान मुंबई यांनी केले आहे.

## भीमा कोरेगाव शौर्य दिनी भीम अनुयांना अत्यावश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देणार : जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी पुणे

# ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाचा विकास आराखडा पुणे जिल्हाधिकाऱ्याकडून सादर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : १ जानेवारी भीमा कोरेगाव शौर्यदिनी ऐतिहासिक विजयस्तंभ स्मारकास मानवंदना देण्यासाठी देशातील विविध राज्यातून लाखोच्या संख्येने भीम अनुयायी नागरिक येत असतात. याही वर्षी मोठ्या प्रमाणात एक जानेवारी रोजी भीमा कोरेगाव येथे हा कार्यक्रम साजरा व्हावा या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था बार्टी महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करीत आहे त्याचाच भाग म्हणून मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली भीमा कोरेगाव संदर्भात सातत्याने विकास आराखड्यासंदर्भात बैठका होत आहेत.

ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकास राज्य शासनाने राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा देऊन विकास करावा अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून आंबेडकरी चळवळीतील विविध पक्ष संघटनानी महाराष्ट्र शासनाकडे केली होती.

भीमसैनिकांची मागणी लक्षात घेऊन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री श्री संजयजी शिरसाठ यांनी भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश प्रशासनास दिले होते.

पुण्याचे जिल्हाधिकारी तथा भीमा कोरेगाव शौर्य दिन शासकीय समितीचे अध्यक्ष श्री जितेंद्र डुडी यांनी भीमा कोरेगाव स्मारकाचा विकास आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ सादर करावा असे निर्देश दिले होते.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने भीमा कोरेगाव स्मारकाचा विकास आराखडा तयार करून तो आज मा. जिल्हाधिकारी , पुणे यांच्याकडे सादर केला. या विकास आराखड्यामध्ये भव्य स्मारक, ग्रंथालय, महार रेजिमेंटचे संग्रहालय, सभागृह, गार्डन, पार्किंग, बुक स्टॉल, भीमा नदीचे सौंदरयीकरण, वार मेमोरियल, आधीचा समावेश करण्यात आला आहे.

राजाचे सामाजिक न्याय मंत्री श्री संजयजी शिरसाठ यांनी दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी विजयस्तंभ स्मारकास मानवंदना देऊन भीम सैनिकांशी संवाद साधला होता. तसेच त्यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात विजय स्तंभ स्मारकास मानवंदना देण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावे आणि स्मारकाच्या विकासासाठी १०० कोटी रुपये देणार असल्याचे सांगितले होते.

तसेच स्मारकाचा कायम स्वरूपी विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले होते.

दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२५ रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन शासकीय समितीचे अध्यक्ष तथा पुणे जिल्हाधिकारी श्री जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारक परिसरातील जागेवर कायम स्वरूपी सुविधा निर्माण करणे आणि विकास आराखडा याविषयी बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत श्री विशाल लोंढे यांनी सामाजिक न्याय मंत्री श्री संजयजी शिरसाठ यांनी १०० कोटी रुपयाचा भरघोस निधी भीमा कोरेगाव स्मारकास उपलब्ध करून दिला असून स्मारकाची देखरेख व नियंत्रण बार्टीकडेच राहील असे सांगितले.

या बैठकीला... श्री गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे,

श्री सोमय मुंढे, पोलिस उपायुक्त, परिमंडळ ४ पुणे, श्री भरतकुमार बाविस्कर, अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे, श्रीमती ज्योती कदम, निवासी उपजिल्हाधिकारी पुणे, श्रीमती वंदना कोचुरे, सदस्य सचिव भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन शासकिय समिती तथा प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण पुणे विभाग, श्री विशाल लोंढे, सहाय्यक आयुक्त तथा प्रभारी निबंधक (बार्टी) पुणे, श्री यशवंत माने , प्रांत अधिकारी हवेली , श्री सर्जेराव कुंभार , पोलिस निरीक्षक लोणिकंद पोलिस स्टेशन, बार्टीचे श्री सुमेध थोरात, रामदास लोखंडे यांच्यासह प्रशासनातील अनेक विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# कार्तिकी वारीत वारकऱ्यांची तहान भागवत आहेत स्वेरीचे विद्यार्थी

## स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दरवर्षीप्रमाणे यंदाही कार्तिकी वारीच्या निमित्ताने श्री.विठ्ठल रुक्मिणीच्या भेटीसाठी आतूर झालेल्या आणि दर्शन रांगेत तासन तास उभ्या असलेल्या वारकऱ्यांची तहान स्वेरीचे विद्यार्थी शुद्ध पाणी देवून भागवीत आहेत. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली इंजिनिअरिंगचे विद्यार्थी, विभागप्रमुख आणि प्राध्यापक वर्ग हे पाणी वाटप करत आहेत. स्वेरीचे सचिव डॉ.सुरज रोंगे यांच्या हस्ते रिद्धी सिद्धी मंदिराजवळ पाणी वाटपाच्या या उपक्रमाचे उदघाटन करण्यात आले. या पाणी वाटपाच्या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी तसेच संस्थेतील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी पाणी वाटप करत आहेत. स्वेरीचे विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, प्रा. महुवा बिस्वास, इतर सहकारी, प्राध्यापक व विद्यार्थी या उपक्रमासाठी विशेष कष्ट घेत आहेत. राज्यात तंत्रशिक्षणातून विशेष ओळख निर्माण करणाऱ्या 'स्वेरी' या संस्थेमार्फत, संस्थेच्या स्थापनेप-ासून अर्थात १९९८ पासून विविध समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. यंदा पावसाचे प्रमाण अधिक असल्याने कार्तिकी वारीसाठी वारकऱ्यांची अधिक गर्दी दिसून येत आहे. त्यामुळे परंपरेप्रमाणे दर्शन रांगेतील वारकऱ्यांना आर. ओ. फिल्टर्ड पिण्याचे पाणी वाटपाचे कार्य काल नवमी (शुक्रवार, ३१ ऑक्टोबर) पासून सुरु झाले. वारकऱ्यांच्या उपस्थितीत रिद्धी सिद्धी गणपती मंदिरालगत असणाऱ्या पत्राशेड मधील दर्शन मंडप रांगेतील वारकऱ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी देण्याच्या कार्याला आज दशमीच्या दिवशी अधिक गती आली आहे. सकाळी ८.०० ते सायंकाळी ८.०० या वेळेत गोपाळपूर, रिध्दी-सिध्दी मंदिर व दर्शन बारी, पत्रा शेड या ठिकाणी प्राध्यापक व विद्यार्थी वारकऱ्यांना प्रचंड उत्साहाने आर. ओ. फिल्टर्ड पाण्याचे वाटप करत आहेत. नवमी, दशमी व एकादशी या तीनही दिवशी विद्यार्थी ग्लास, वॉटर जग आणि वॉटर टँकद्वारे पाणी वारकऱ्यांपर्यंत पोहचवून वारकऱ्यांची तहान भागवणार आहेत.

स्वेरीकडून दररोज साधारण आठ ते दहा हजार लिटर पाण्याचे वाटप केले जात आहे. या कार्यात प्राध्यापक वर्ग व राष्ट्रीय सेवा योज-नेतील विद्यार्थी वारकऱ्यांना पाणी वाटपाचे कार्य मनोभावे करत आहेत. कॉलेजमधून इतर सहकारी पाणी आणून दर्शन रांगेजवळ असलेल्या टाक्यात साठवतात. त्यानंतर विद्यार्थी मोठ्या उत्स-ाहाने वारकऱ्यांना पाणी वाटप करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रत्येक दिवशी जवळपास ४ प्राध्यापक व जवळपास २५ विद्यार्थी दिवसभर मोफत शुद्ध पाणी वाटप करत आहेत.

# काँग्रेसचे बाळासाहेब सांगवे यांची खरोसा गटात गावोगावी भेटीगाटी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव : खरोसा जिल्हा परीषद गटातुन खरोशाचे सुपुत्र अध्यात्मीक कुटुंबातुन आलेले बाळासाहेब सांगवे यांना गावोगावी भेटीगाठीत जनतेचा उदंड प्रतिसाद.

खरोसा जिल्हा परीषद गटासाठी सर्वसाधारण पुरुष आरक्षण सुटल्याने खरोसा येथील काँग्रेस चे कार्याध्यक्ष असलेले बाळासाहेब सांगवे यांना खरोसा जिल्हा परीषद ची उमेदवारी मीळणार अशी जोरदार चर्चा खरोसा गटात पहायला मीळत आहे, बाळास-ाहेब सांगवे यांनी अनेक वर्षापासुन काँग्रेस पक्षासाठी काम केल असुन .सहकार महर्षी दिलीपराव देशमुख .लातुरचे आ अमित भैया विलासराव देशमुख .जिल्हा बॅकेचे अध्यक्ष तथा ग्रामिनचे मा.आ धिरज विलासराव देशमुख .कॉग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके .व काँग्रेसचे मा.जिल्हाध्यक्ष श्रिशैल्य आप्पा उटगे याच्या म ार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्षाला जिल्यात व औसा तालुक्यात पक्षाला बळकटी देण्यासाठी व संघटन मजबुतीसाठी बाळासाहेब सांगवे यांनी काम केल असुन .पक्षनिष्टा काय असते व एकनिष्ठेने काम कस करायच याच ज्वलंत उदाहरण महनजे बाळासाहेब सांगवे .खरोसा गावचे रहिवाशी अस-लेले बाळासाहेब सांगवे हे सांप्रदायीक व धार्मिक कुटुंबातुन येतात तीन पिढ्यापासुन त्यांच्या घराण्याला सांप्रदायीक वारसा असुन . बाळास-ाहेब सांगवे यांचे आजोबा, वडील हे निस्सीम अशी किर्तनसेवा .भजन .सह सांप्रदायात एक नावलौकीक असलेल नेतृत्व होते. तोच पारंपारीक वारसा चालवत बाळासाहेब सांगवे हेही सांप्रदायात सामील असतात .खरोसा परीसरात सप्ताह, यात्रा सारख्या धार्मीक कार्यात ते सढळ हाताने अर्थसहाय करतात व वेळेत वेळ काडुन सर्वसामान्याच्या सुख दुख्खात सहभागी होतात ,निर्व्यसनी ,निस्वार्थी निश्कलंक ,व युवा पीढीला चांगल्या विचारांची देवान घेवान करणारे, सर्वांना आपलस मानुन मनोभावे जन-तेची सेवा करणारे सर्वाच्या गळ्यातील ताईत असलेले बाळासाहेब सांगवे यांनी खरोसा जिल्हा परीषद गटात काँग्रेस पक्षाकडुन निवडणुक लढावी अशी मागणी सर्वसामान्य मतदार व लोकांतुन केली जातेय, तस पहायला गेल तर बाळासाहेब सांगवे यांना कुटलाही राजकीय वारसा नसुन दैनंदिन जिवनात कुटलाही कुटेही स्वार्थ न ठेवत निस्वार्थ पणे सर्वांना सोबत घेउन चालणारे बाळासाहेब सांगवे ,यांना जिल्हा परीषदेत पाठउन त्यांनी सर्वसामान्य जनेतेची सेवा करावी.

असा आग्रह बाळासाहेब सांगवे यांना काँग्रेसने उमेदवारी द्यावी व आम्ही बाळासाहेब सांगवे यांना निवडुण आनुन पक्षाने दिलेल्या संधीच सोन करु असा आग्रह खरोसा गटातील जनतेचा असल्याच प्रसारम ाध्यमांना पहायला मीळाले . तरी जनतेची भावना लक्षात घेता कॉग्रेस पक्षश्रेष्ठीने बाळासाहेब सांगवे यांना उमेदवारी द्यावी असा आग्रह सर्वसाम ान्य मतदार व खरोसा गटातील ग्राम स्थ करत आहेत.

# भाळवणीतील कीर्ती महामुनी हिची इन्फोसिस कंपनीत निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील कीर्ती प्रकाश महामुनी हिची इन्फोसिस कंपनीत निवड झाली आहे. त्याबद्दल किर्ती महामुनी हिचा शाल, हार,पेढे वाटून सत्कार डॉ.नवनाथ खांडेकर,राहुल ताटे देशमुख व प्रशांत माळवदे यांच्या हस्ते करण्यात आला.

**किर्ती महामुनी हिचे पहिली ते चौथी शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुली, इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंत शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स भाळवणी, शासकीय महाविद्यालय कराड येथे इंजिनिअरिंगचे शिक्षण.**

यावेळी डॉ.नवनाथ खांडेकर म्हणाले की, इन्फोसिस कंपनीत सहज नोकरी मिळत नाही. कीर्तीने खूप मेहनत घेतल्यामुळे या कंपनीत नोकरी मिळाली आहे.त्याबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

राहुल ताटे म्हणाले की कीर्तीच्या घरातील कौटुंबिक परिस्थिती अतिशय हलाखीची असून वडिलांचे छत्र नसू-नही अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. कीर्तीच्या या पुढील वाटचालीस ताटे यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी किर्ती महामुनी म्हणाली की माझ्या शिक्षणाची सर्व जबाबदारी माझ्या आईने पूर्ण केली आहे. वडील नसताना ही आईने कोणत्याही गोष्टीची कमतरता पडू दिली नाही त्यामुळेच मी माझे शिक्षण पूर्ण करू शकले यापुढील काळात आई व सर्व गुरुजन यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत राहील. यावेळी प्राची माळवदे,ज्योती महामुनी आदि उपस्थित होते.यावेळी प्रसाद म हामुनी यांनी आभार मानले.

# आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या सुनीता गजानन तांबे कालवश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/रामदास धो. गमरे : आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते, लघु उद्य-ोजक संतोष तांबे यांच्या म ातोश्री सुनीता गजानन तांबे मु. गाव साखर, ता. खेड, जिल्हा रत्नागिरी यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने राहत्या घरी दुःखद निधन झाले.

दिवंगत सुनीता तांबे या आदर्श माता, आदर्श कार्यकर्त्या व आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून प्रसिद्ध असून त्या सोज्वळ मनाच्या, हसतमुख, मनमिळाऊ, प्रेमळ व दानशूर स्वभावाच्या होत्या, त्यांच्या अंत्ययात्रेत विविध राजकीय पक्षांचे, सामाजिक संघटनांचे, खेड १५ गाव ग्रुपमधील मान्यवर व समाजातील सर्वच स्तरातील लोक म ोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांच्या अचानक जाण्याने समाजात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. आपल्या गोडवाणीने व समंजस स्वभावाने त्यांनी माहेर, सासर या दोन्ही परिवारांचा समनव्य सांभाळत दोन्ही परिवारांना एकसंध ठेवलं होतं. त्यांच्या मागे त्यांचे चिरंजीव संतोष तांबे, राजेश तांबे, शैलेश तांबे ही तीन मुले, तीन सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

दिवंगत सुनीता गजानन तांबे यांचा पुण्यानुमोदन व शोकसभेचा कार्यक्रम रविवार दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता १०९ साई विसावा, एल एन मार्ग, माटुंगा - (पू.) म ुंबई नंबर ४०००१९ रुईया कॉलेज च्या सम ोर व इंडियन ऑइल पेट्रोल पंप च्या मागे या त्यांच्या राहत्या घरी साखरकर भावकी आणि बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ४९ यांच्या अधिपत्याखाली गौतम जाधव यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे तरी आपल्या आदर्शास साश्रु नयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन साखरकर भावकी व तांबे कुटुंबीयांनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ताकतीने लढवा : जिल्हाध्यक्ष उमेश पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे सोलापूर जिल्ह्याची संपर्क मंत्री दत्तात्रय मामा भरणे यांच्या आद-ेशाने जिल्हाध्यक्ष उमेश पाटील प्रांतिक सदस्य कल्याणराव काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पंढरपूर यशवंतराव चव्हाण सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा बैठक पार पडली.

यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, व नगरपालिका निवडणुका संदर्भात कार्यकर्त्यांची मते जाणून घेऊन तरुणांना जास्तीत जास्त संधी कशी देता येईल यासाठी प्रयत्न करणार असून येणाऱ्या सर्व निवडणुका या ताकतीने लढवण्याची असे आव्हान त्यांनी केले.

प्रांतिक सदस्य कल्याणराव काळे यांनी गट व गणाची माहिती देऊन इच्छुकांनी गर्व गटात पक्षाची मागणी करून यावेळी सांगितले. तालुक्यातील सर्वच निवडणुका पक्षाचे चिन्ह लढू असे त्यांनी आवाहन केले कार्यकर्त्यांनी सुसंवाद साधून तरुणांना संधी देण्याचा प्रयत्न केला जाईल. असेही यावेळी म्हटले.

यावेळी युवक प्रदेश उपाध्यक्ष समाधान काळे महिला जिल्हाध्यक्ष वर्षा राणी शिंदे, प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे महिला जिल्हा उपाध्यक्ष राजश्री ताड महिला शहर अध्यक्ष कांचन जाधव, दिगंबर सुडके मोहम्मद वस्ताद, नारायण शिंदे, अर्जुन जाधव, मधुकर बागल अंकुश चव्हाण, युवक तालुका अध्यक्ष योगेश जाधव भारत पाटील सादिक मुलानी, विठ्ठलचे माजी संचालक उत्तम नाईकनवरे, यशवंतराव चव्हाण पंचवटीचे चेअरमन शहाजी साळुंखे, ताराम सहकारी साखर कारखान्याची संचालक महादेव देटे, सहकार शिरोमणी चे व्हाईट चेअरमन भारत कोळेकर, व संचालक मंडळ तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आजी-माजी सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# जेऊर जि.प.गटातून निजपा गायकवाड यांना उमेदवारी देण्याची कार्यकर्त्यांची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :जेऊर जिल्हा परिषद राखीव झाल्याने उमेदव-ारी मिळवण्यासाठी भारतीय जनता पक्षातील इच्छुकांमध्ये चांगलीच चढाओढ लागली आहे. पक्षाकडून मलाच पसंती आहे.असा संदेश श्रेष्ठीपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.इच्छुकांनी विविध कार्यक्रम,उपक्रम,कार्यकर्त्यांच्या भेटीगाठीवर भर देत आहे.

सुसंस्कृत,युवकांचे आधारस्तंभ,गोरगरिब लोकांच्या अडचणीला नियमित धावून जाणारे भाजपा अनु विभागाचे तालुकाध्यक्ष निजपा गायकवाड यांना भाजपकडून उमेदव-ारी देण्यात यावी अशी मागणी कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.जेऊर जिल्हा परिषद गट हे माजी जिल्हा परिषद सदस्य मल्लिकार्जुन पाटील यांचा आहे. परंतु यंदा मात्र राखीव झाल्याने एका मागासवर्गीय युवकांना संधी मिळावी.अशी कार्यकर्त्यांची परखड इच्छा आहे.निजपा गायकवाड यांना उमेदवारी दिल्यास जीवाचे रान करून कमळ फुलविण्याचा संकल्प कार्यकर्त्यांनी केला आहे.

जेऊर जिल्हा परिषद गटांम ध्ये उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत.कार्यकर्त्यांनी केलेल्या सर्वेक्षणात निजपा गायकवाड यांचे पारडे जड असल्याचे बोलले जाते.

निजपा यांना मोठी संधी असल्याचे स्पष्ट दिसत असल्याने कार्यकर्त्यांनी अधिकच जोमाने कामाला लागले आहेत.संजय गांधी निराधार कमिटीवर सदस्य असताना निजपा गायकवाड यांनी अनेक निराधारांना आधार देण्याचे महत्त्वाची भूमिका बजा-वली आहे.ते नेहमीच गरिबांच्या बाजूने उभे राहिले आहे.

अक्कलकोटच्या राजकीय पटलावर गोरगरिब व सर्वसाम ान्य जनतेचे हित जपण्यासोबतच विकासाची दूरदृष्टी ठेवणारा सामान्य कार्यकर्ता म्हणून निजपा गायकवाड सर्वत्र परिचित आहेत.२०१५ मध्ये ग्रा.पं. सदस्य म्हणुन निवडून आले.त्या दिवसापासून प्रत्येक गरीब लोकांचे कामे करण्यास सुरुवात केली.अनंत अडचणी आल्या. खचून न जाता, अडचणीवर मात करत ते सामाजिक, राजकीय क्षेत्रात सक्रिय आहे.

त्यांच्या कामाचे कार्य कौशल्य पाहून विद्यमान आमदारांनी निजपा गायकवाड यांना अनुसूचित जाती सेल'चे तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे.

शासनाचे अनेक योज-नेची माहिती जनतेपर्यंत पोहोचण्याचे काम केले. शेळी,गाय,कोंबडी,संसारिक भांडी,गॅस,शिलाई म शीन,शेतकऱ्यांना अवजारे असे अनेक शासनाच्या विविध योजनाचे लाभ लाभार्थ्यांना मिळून दिले.संजय गांधी वयोवृद्ध दिव्यांग अशा गोर-गरीब व्यक्तींना शासनाच्या योजनेची लाभार्थ्यांना मिळून दिले आहे.राजकारणापलीकडे जाऊन मैत्री जपणाऱ्या सर्वसाम ान्य कार्यकर्त्यांमध्ये निजपा गायकवाड यांचे नाव आदरपुर्वक घेतले जाते.गोरगरिब मजुर,काम गार व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी अहोरात्र झटणारा एक ध्येयवेडा कार्यकर्ता आहे.गेल्या अनेक वर्षापासून भाजपाचे एकनिष्ठ व प्रामाणिक अशी ओळख आहे.

पक्षासाठी संपूर्ण वेळ देणारा व मागासवर्गीय कार्यकर्त्यांना निजपा गायकवाड यांना भाजपकडून उमेदवारी मिळावी म्हणून कार्यकर्त्यांनी प्रखर इच्छा व्यक्त केली आहे.'अभी नही तो कभी नही',निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी चालून आली आहेत.या संधीचे सोनं व्हावं अशी कार्यकर्त्यांनी इच्छा आहे.

**दशरथ वडतिले यांची माहिती**

**अनेक शाळांतील पाच हचार विद्यार्थी सहभागी होणार**

# सोलापुरात आयटीआयच्यावतीने ७ नोव्हेंबरला होम मैदानवर वंदेमातरम गौरव महोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापुरातील दोन्ही शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्यावतीने शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते ११ वेळेत होम मैदानावर वंदे मातरम गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे,या महोत्सवात शहरातील अनेक शाळांमधील जवळपास पाच हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत,अशी माहिती संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री.दशरथ वडतिले यांनी पत्रकार परिषदेत दिली. ऋषी बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी लिहिलेल्या ऐतिहासिक वंदे मातरम या राष्ट्रीय गीतास यंदा दीडशे वर्षे पूर्ण झाले आहे,त्यानिमित्त महाराष्ट्र शासनाच्यावतीने विशेषता कौशल्य विकास,उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव सर्वत्र साजरा केला जात आहे, सोलापूरसह राज्यातील ३६ जिल्ह्यातील व ३५८ तालुक्यातील अशासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत एकाच दिवशी दिनांक ७ नोव्हेंबरला सकाळी १०.२५वाजता वंदे मातरमचे सामुदायिक गायन करण्याचा विक्रम करण्यात येणार असल्याचे व त्याची गिनिज बुकमध्ये नोंद करन्याचा निर्धार असल्याचे श्री.वडतिले यांनी सांगितले.या महोत्सवातील कार्यक्रमात होम मैदानावर सामाजिक पटनाट्य सादर करण्यात येणार असून,तरुण भारतचे माजी संपादक व ज्येष्ठ अरविंद जोशी हे मुख्य वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.या महोत्सव निमित्त जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली सतरा मान्यवरांची समिती गठित करण्यात आली असून या समितीत समाजाच्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश आहे.या राष्ट्रीय कार्यक्रमास सर्व देशभक्त व्यक्ती,विद्यार्थी व विविध संस्थांनी मोठ्या उपस्थित रहावे,असे आव-ाहन संयोजन समितीच्यावतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस संस्थेचे उपप्राचार्य श्री. एस.एस. झणझणे, कार्यालय अध-ीक्षक श्री.बालाजी माळी,श्री. प्रदीप दराडे,श्री.विशाल भांगे, वरिष्ठ गट निदेशक श्री.सिद्राम गोलेकर व श्री.बी.एस कोंडगुळी आदी उपस्थित होते.

**विक्रमाची गिनीज बुकमध्ये नोंद करण्याचा निर्धार; पत्रकार अरविंद जोशी मुख्य वक्ते**